नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - २०१ Issue - 201 | वार रविवार दि. ८ डिसेंबर २०२४ Blow- Sunday Date 8 December 2024 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पुन्हा जीवे मारण्याची धमकी

### तपास सुरु; मुंबई पोलिसांना धमकीचा संदेश मिळाल्याने खळबळ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : गेल्या काही दिवसांपासून मुंबई पोलीस आणि ट्रॅफिक कंट्रोलला धमक्यांचे फोन येत असल्याच्या घटना समोर येत आहेत. यातच आज (७ डिसेंबर) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पुन्हा एकदा जीवे मारण्याची धमकी देण्यात आल्याचा संदेश मुंबई पोलिसांच्या ट्रॅफिक हेल्पलाइन व्हॉट्सप नंबरवर आला असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. हा धमकीचा संदेश मिळताच पोलिसांनी तातडीने तपासाला सुरुवात केल्याचं सांगण्यात येत आहे.



मुंबई पोलिसांनी त्यांच्या ट्रॅफिक हेल्पलाइन व्हॉट्सप नंबरवर पंतप्रधान मोदी यांना आयएसआय एजंट समावेश असलेल्या धमकीचा मेसेज मिळाल्यानंतर पोलिसांनी एफआयआर नोंदवला आहे. तसेच हा धमकीचा मेसेच राजस्थान येथील अजमेरमधून आला असल्याची माहिती पोलिसांनी शोधून काढली आहे. आरोपींचा माग काढण्यासाठी पोलिसांचे पथक रवाना झाल्याची माहिती देखील सांगण्यात येत आहे. यासंदर्भातील वृत्त इंडियन एक्स्प्रेसनं दिलं आहे.

दरम्यान, एका पोलीस अधिकाऱ्याने सांगितलं की, हेल्पलाइन आलेल्या संदेशात दोन आयएसआय एजंटचा सहभाग आणि मोदींवर बॉम्ब हल्ला करण्याचा कट रचल्याचा उल्लेख करण्यात आलेला आहे. दरम्यान, याआधीही अशा प्रकारची जीवे मारण्याची धमकी देण्यात आली होती. त्यानंतर आता पुन्हा एकदा जीवे मारण्याची धमकी मिळाल्यानंतर पोलीस अलर्ट झाले असून या प्रकरणाचा तपास सुरु करण्यात आला आहे.

दरम्यान, अशा प्रकरणांमध्ये याआधी पोलिसांना असंही आढळून आलेलं आहे की, काही लोक दारूच्या नशेत किंवा मानसिक आरोग्याच्या समस्यांनी ग्रस्त असल्याने असे धमकीचे संदेश पाठवतात. मुंबई पोलिसांना मिळालेले बहुतांश धमकीचे संदेश त्यांच्या एकमेव व्हॉट्सपवर येतात. जो ट्रॅफिक पोलीस हेल्पलाइन म्हणून वापरण्यात येतो. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना धमकी देणारी व्यक्ती दारूच्या नशेत असावी किंवा मानसिकदृष्ट्या समस्यांनी ग्रस्त असावी, असाही संशय व्यक्त करण्यात येत असल्याचं एका पोलीस अधिकाऱ्याने सांगितलं आहे.

## मविआ आमदारांना उद्या शपथ घ्यावीच लागेल, अन्यथा, अजित पवारांचा इशारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




मुंबई : महायुती सरकारचा शपथविधी सोहळा दोन दिवसांपूर्वी संपन्न झाला असून तीन मंत्र्यांचं सरकार कामाला लागलं आहे. पाठोपाठ या सरकारने विधानसभेचं विशेष अधिवेशन बोलावलं आहे. आज (७ डिसेंबर) विधान भवनात नवनिर्वाचित आमदारांचा शपथविधी पार पडला. मात्र, महाविकास आघाडीमधील एकाही आमदाराने आज विधानसभा सदस्यत्वाची शपथ घेतली नाही. महायुतीने ईव्हीएममध्ये घोळ करून हा विजय मिळवला असल्याचा दावा करत विरोधकांनी शपथविधीवर बहिष्कार टाकला. तसेच महायुतीच्या विजयाचा निषेध नोंदवला. दरम्यान, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विरोधकांच्या या आंदोलनावरून त्यांच्यावर टीका केली आहे. तसेच विधानसभेतील आमचा विजय हा ईव्हीएमचा विजय असं विरोधकांचं म्हणणं म्हणजे त्यांचा रडीचा डाव आहे, असंही अजित पवार म्हणाले.

आमच्या महायुतीला एवढ निर्विवाद आणि प्रचंड बहुमत मिळालं आहे. मात्र, विरोधक त्यांचा पराभव स्वीकारण्याऐवजी ईव्हीएमचा मुद्दा काढून रडीचा डाव खेळण्याचा प्रयत्न करत आहेत. मी देखील यापूर्वी महाविकास आघाडीत काम केलं आहे. मी महाविकास आघाडीचा एकेकाळचा कार्यकर्ता आहे. परंतु, मला हे ईव्हीएमला दोष देणं वगैरे पटत नाही. याला काही अर्थ नाही, अशा शब्दांत अजित पवारांनी विरोधकांच्या आंदोलनावर टीका केली.

उपमुख्यमंत्री म्हणाले, लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात महाविकास आघाडीच्या ३१ जागा निवडून आल्या. तेव्हा यांच्यासाठी ईव्हीएम चांगलं होतं. परंतु, विधानसभा निवडणुकीत यांचा पराभव झाला तर हे ईव्हीएमला दोष देऊ लागले आहेत. लोकशाहीत कधी आघाडीला तर कधी युतीला यश मिळत असतं. त्यानंतर पक्षांना व त्यांच्या नेत्यांना हवं ते वक्तव्य करण्याचा अधिकार आहे. मात्र, त्यांच्या निवडून आलेल्या आमदारांना उद्या संध्याकाळपर्यंत शपथ घ्यावी लागेल. शपथ घेण्याचा उद्याचा शेवटचा दिवस आहे.

## मोठ्या राज्यात भाजपाचा विजय झाला आहे, तर छोटी राज्ये विरोधकांकडे गेली : पवार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर फारसे सार्वजनिक मंचावर न दिसलेले शरद पवार आता पुन्हा सक्रिय झाले आहेत. आज कोल्हापूर येथे पत्रकार परिषद घेऊन त्यांनी विधानसभा निवडणुकीच्या निकालावर भाष्य केले. तसेच उद्या मारकडवाडी येथे जाऊन ग्रामस्थांशी संवाद साधणार असल्याचे सांगितले. निवडणुकीत यश मिळाल्यानंतर एक उत्साहाचे वातावरण असते. पण मला महाराष्ट्रात तसे वातावरण दिसत नाही. पण मी उगीचच आरोप करणार नाही. कारण माझ्याकडे अधिकृत माहिती नाही. आम्ही फक्त मतदानाची आकडेवारी गोळा केली आहे. प्रत्येक राजकीय पक्षाला एकंदर किती मते मिळाली आणि त्यांचे किती लोक निवडून आले, असे सांगून शरद पवारांनी विधानसभेच्या निकालाचे विश्लेषण केले.

शरद पवार पुढे म्हणाले, काँग्रेस पक्षाला ८० लाख मते पडली आणि त्यांचे फक्त १६ आमदार निवडून आले. तर शिवसेना शिंदे गटाला ७९ लाख मते मिळाली आहेत, त्यांचे ५७ आमदार निवडून आले आहेत. म्हणजे एक लाख कमी मतदान मिळूनही काँग्रेसपेक्षा ४१ आमदार अधिक निवडून आले आहेत. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाची मते ७२ लाख आहेत. पण आमदार निवडून आले फक्त १० आणि राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाला ५८ लाख मतदान मिळाले, पण त्यांचे ४१ आमदार निवडून आले आहेत.

शरद पवार म्हणाले, आकडेवारीतून काही गोष्ट दिसत असल्या तरी आमच्याकडे अधिकृत अशी काही माहिती नाही. त्यामुळे मी आज तरी ईव्हीएमवर शंका घेत नाही. हे फक्त मतांचे आकडे असून ते आश्चर्यकारक आहेत. विधानसभेचे अधिवेशन सुरू झाले. तिथे सत्ताधारी आमच्यावर टीका करत होते. 'लोकसभेला ईव्हीएमची तक्रार नव्हती, आताच ईव्हीएमविरोधात तक्रार का करता?' असा युक्तीवाद सत्ताधारी करत असल्याचे मी ऐकले. पण मागच्या दोन महिन्यात चार निवडणुका झाल्या. त्यावरून सांगतो, हरियाणामध्ये भाजपाची अवस्था अतिशय वाईट होती, पण तिथे त्यांचा विजय झाला. जम्मू-काश्मीरमध्ये काँग्रेसला फारसे यश मिळाले नाही, तिथे नॅशनल कॉन्फरन्सला यश मिळाले. महाराष्ट्रात भाजपाचा विजय झाला आणि आमचा पराभव झाला. पण त्याचवेळेला झारखंडमध्ये त्यांचा पराभव झाला. या चारही राज्याच्या निकालावरून सत्ताधारी हे म्हणू शकतात की, दोन निवडणुकीत एका ठिकाणी तुम्ही जिंकलात आणि दुसरीकडे आम्ही जिंकलो. त्यामुळे ईव्हीएमचा काही संबंध नाही. पण त्यातून असे दिसते की, मोठ्या राज्यात भाजपाचा विजय झाला आहे, तर छोटी राज्ये विरोधकांकडे गेली आहेत, असेही शरद पवार म्हणाले. माळशिरस विधानसभा मतदारसंघातील मारकडवाडीतील लोक मतपत्रिकेवर मतदान घेण्यासाठी ग्रामस्थ इच्छुक आहेत. पण प्रशासनाने त्यास विरोध दर्शविला. प्रचारावेळी निवडणुकीची सभा बघूनच कोणता उमेदवार जिंकणार हे कळते. कोल्हापूरमध्येही आमच्या उमेदवारांच्या सभा जोरदार झाल्या. पण त्यांचा पराभव झाला. राज्यात मुख्य निवडणूक प्रक्रिया होऊन गेली आहे. त्यामुळे एखाद्या गावाने जर त्यांच्या पद्धतीने मतदान घेण्याचा निर्णय घेतला असेल तर त्यावर बंदी कशासाठी आणि कोणत्या कायद्याद्वारे? १४४ सारखे कलम लावण्याची गरजच काय? त्यामुळे गावातल्या लोकांचे नेमके म्हणणे काय आहे, यासाठी मी मारकडवाडीत जाणार आहे, असे शरद पवार यांनी कोल्हापूर येथील पत्रकार परिषदेत सांगितले.

## ईव्हीएमवर संशय घेणाऱ्या शरद पवारांवर मुख्यमंत्री फडणवीसांचा निशाणा; थेट आकडेवारी मांडत दिले उत्तर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : विधानसभा निवडणुकीत महायुतीला मोठे बहुमत मिळाले असून पुन्हा सत्तेत विराजमान झाली आहे. सर्व एक्झिट पोल खोटे ठरवत महायुतीने मोठी बाजी मारली आहे. भाजपचा तब्बल १३२ जागांवर विजय झाला आहे तर महायुतीचा २३५ जागांवर डंका वाजवला आहे. महाविकास आघाडीचा केवळ ५० जागांपेक्षाही कमीवर समाधान मानावे लागले आहे. परिणामी या निकालावर विरोधकांकडून आक्षेप घेण्यात आला आहे. तसेच हा निकाल संशयास्पद असल्याचे देखील राजकीय विश्लेषकांचे मत आहे. यातच शरद पवार यांनी देखील ईव्हीएम प्रणालीवर संशय व्यक्त केला. शरद पवारांच्या या भूमिकेवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी टीकास्त्र डागले आहे. तर मतांची आकडेवारी देखील मांडली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी एक्स हँडलवर पोस्ट लिहून शरद पवारांवर खोचक टीका केली. 'श्री शरद पवार साहेब, आपण ज्येष्ठ नेते आहात, किमान आपण तरी देशातील जनतेची दिशाभूल करू नका. जास्त मतं मिळूनही कमी जागा कशा?' असे फडणवीस म्हणाले. तर पुढे त्यांनी गत निवडणुकीतील मतांची आकडेवारी देखील मांडली आहे. ते म्हणाले, 'पवार साहेब चला २०२४ च्या लोकसभेत काय झाले ते पाहू, भाजपाला मतं १,४९,१३,९१४ आणि जागा ९ पण काँग्रेसला मतं ९६,४१,८५६ आणि जागा १३. शिवसेनेला ७३,७७,६७४ मतं आणि ७ जागा, तर राष्ट्रवादी-शरद पवार गटाला ५८,५१,१६६ मतं आणि ८ जागा. यासोबतच २०१९ च्या लोकसभेचे उदाहरण तर फारच बोलके आहे. काँग्रेसला ८७,९२,२३७ मतं होती आणि १ जागा मिळाली, तर तत्कालीन राष्ट्रवादीला ८३,८७,३६३ मतं होती आणि जागा ४ आल्या.

'साहेब पराभव स्वीकारला तर यातून लवकर बाहेर याल! तुम्ही तरी आपल्या सहकाऱ्यांना आत्मपरीक्षण करण्याचा सल्ला द्याल, अशी अपेक्षा आहे,' अशी टीका देखील देवेंद्र फडणवीसांनी केली. फडणवीसांनी ही आकडेमोड दाखवत एकप्रकारे पक्षाची मते आणि जागांमधील तफावत दाखवली आहे. शरद पवारांसोबतच विरोधक कसे प्रत्युत्तर देणार हे पाहावे लागणार आहे.

पुण्यात माध्यमांशी संवाद साधताना पवार म्हणाले, राज्यात महायुतीचा धक्कादायक विजय झालेला आहे. चार राज्याच्या निवडणूका झाल्या आहेत. हरियाणात निवडणूका झाल्या तेव्हा आपण तेथे गेलो होतो. तिथेही भाजपाची स्थिती अत्यंत कठीण होती. पण भाजपा अचानक सत्तेत आली. जम्मू-काश्मीरमध्ये मात्र फारुख अब्दुल्ला आले. काँग्रेसला अत्यंत कमी मते मिळाली. महाराष्ट्रात भाजपला मोठे यश मिळाले असले तरी त्याचवेळी झारखंडमध्ये भाजपचा पराभव झाला आहे. त्यामुळे सत्ताधारी पक्ष हे सांगू शकतात. दोन निवडणुकीमध्ये एका ठिकाणी तुम्ही जिंकला, दुसऱ्या ठिकाणी आम्ही जिंकलो. मग त्यात ईव्हीएमचा काहीच संबंध नाही? एक चित्र दिसतंय की, मोठी राज्य तिथे भाजप तर छोटी राज्य आहेत तिथे अन्य पक्ष निवडून आलेले आहेत, असेही पवारांनी नमूद केले होते.

### हिंदुत्ववादी संघटनांकडून सहा याचिका दाखल


### तीन सदस्यीय विशेष खंडपीठ स्थापन

## प्रार्थनास्थळ कायद्यावर सुनावणी नव्या खंडपीठाकडे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : प्रार्थनास्थळ कायदा (विशेष सुधारणा), १९९१च्या विशिष्ट तरतुदींच्या वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकांवर सुनावणी घेण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने सरन्यायाधीशांच्या नेतृत्वाखाली तीन सदस्यीय विशेष खंडपीठ स्थापन केले आहे.

सरन्यायाधीश संजीव खन्ना, न्या. संजय कुमार आणि न्या. के व्ही विश्वनाथन यांच्या विशेष खंडपीठासमोर १२ डिसेंबरला दुपारी साडेतीन वाजता या कायद्याला आव्हान देणाऱ्या याचिकांवरील सुनावणी होण्याची शक्यता आहे. सुब्रमण्यम स्वामी यांनी दाखल केलेल्या याचिकांसह प्रार्थनास्थळ कायद्याला आव्हान देणाऱ्या एकूण सहा याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल आहेत. स्वामी यांनी हा कायदा अधिक स्पष्ट करून सांगण्याची विनंती केली आहे. तर, वकील अश्विनी उपाध्याय यांनी या कायद्याचे कलम २, ३ आणि ४ रद्द करावेत अशी मागणी आपल्या याचिकेत केली आहे. या कलमांमुळे कोणत्याही व्यक्ती किंवा धार्मिक गटाच्या प्रार्थनास्थळावर पुन्हा हक्क सांगण्याचा न्यायिक उपाय हिरावून घेतला जातो असा दावा



याचिकाकर्त्याने केला आहे. तसेच कायदा करताना केंद्र सरकारने निर्धारित केलेल्या १५ ऑगस्ट १९४७ या तारखेवरही आक्षेप घेतला आहे. उपाध्याय यांच्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने मार्च २०२२ रोजी केंद्र सरकारला नोटीस बजावली होती.

वाराणसीतील ज्ञानवापी मशीद, मथुरेतील शाही ईदगाह मशीद, संभलमधील शाही जामा मशिदीसह अजमेरचा दर्गा, भोजशाला यासारख्या प्रार्थनास्थळांवर दावा करणाऱ्या याचिका हिंदू संघटनांनी दाखल केल्या आहेत.

प्रार्थनास्थळ कायदा (विशेष सुधारणा) १९९१नुसार, कोणत्याही प्रार्थनास्थळाचे १५ ऑगस्ट १९४७ रोजी असलेले धार्मिक स्वरूप बदलण्यास किंवा खटला दाखल करून त्यावर दावा करण्यास मनाई आहे.

## अजित पवारांना दिलासा, मालमत्तेवर टाच आणण्याचा आदेश रद्द

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महायुती सरकारच्या शपथविधीच्या दिवशीच उपमुख्यमंत्री अजित पवार यांची खऱ्या अर्थाने चिंता मिटली आहे. उपमुख्यमंत्री पद तर मिळालेच पण अजित पवारांशी संबंधित कारखान्याच्या मालमत्तेवर टाच आणण्याचा आदेश दिल्लीतील लवादाने रद्द केल्याने त्यांना दुहेरी लाभ झाला. पहाटेच्या शपथविधीनंतर सिंचन घोटाळ्यात अभय तर महायुती सरकारमधील शपथविधीच्या दिवशीच शेकडो कोटीच्या मालमत्तेवरील टाच उठली आहे. यावरून विरोधकांनी टीका केली आहे. अजित पवार विरोधी पक्षात असताना सातारा जिल्ह्यातील जरंडेश्वर साखर कारखान्याची मालमत्ता लिलावात खरेदी करण्यावरून ईडी व प्राप्तिकर विभागाने कारवाई केली होती. अजित पवार यांच्या भगिनींच्या निवासस्थानी तीन दिवस छापे पडले होते. जरंडेश्वर साखर कारखान्याची मालमत्ता अजित पवार यांच्या नातेवाईकांनी खरेदी केल्याचा आरोप झाला होता. त्या दृष्टीने ईडी व अन्य यंत्रणांनी तपास केला होता. लिलावात हा कारखाना ताब्यात घेणाऱ्या कंपनीने बेनामी कंपन्यांच्या माध्यमातून पैसे उभे केल्याच आरोप झाला होता. अजित पवार यांचे जवळचे नातेवाईक , त्यांच्या निकटवर्तीयांशी संबंधितांकडून हा कारखाना चालविण्यास घेण्यात आला होता. तसेच अजित पवार हे पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक असताना कारखाना चालविणाऱ्या कंपनीला सुमारे ७०० कोटींचे कर्ज मंजूर झाले होते याकडे केंद्रीय यंत्रणांनी लक्ष वेधले होते. जरंडेश्वर साखर कारखान्याची मालमत्ता खरेदी केलेल्या कंपनीशी अजित पवार व त्यांच्या कुटुंबीयांचा थेट संबंध असल्याचे ईडीला आढळले होते. अजित पवार, पत्नी सुनेत्रा आणि पुत्र पार्थ यांनी मालमत्ता खरेदीसाठी बेनामी व्यवहार केल्याचा आरोप झाला होता. यातूनच पुढे जरंडेश्वर साखर कारखान्याच्या मालमत्तेवर आयकर विभागाने टाच आणली होती. या विरोधात दाखल झालेल्या अपिलावर 'दी स्मगलर्स ॲण्ड फॉरेन एक्सचेंज मॅन्यूप्लेटर्स' कायद्याअंतर्गत लवादाने टाच आणण्याचा आदेश रद्द केला आहे. केंद्रीय यंत्रणेने दाखल केलेले अपील लवादाने फेटाळून लावले. अजित पवार, सुनेत्रा पवार वा पार्थ पवार यांनी कथित बेनामी मालमत्ता खरेदीसाठी पैसे पुरविल्याचा फिर्यादी पक्ष पुरावा सादर करू शकलेले नाही, असे लवादाने निरीक्षण नोंदविले आहे.

# परमपूज्य बोधिसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त उद्धारकरत्या महामानवास विनम्र अभिवादन

गावगाड्यातील किंवा गावकुसाबाहेरचा कोणताही समाज असो अथवा घटक त्याला मानवतावादी व विज्ञानवादी आंबेडकरवादा शिवाय पर्याय नाही ही काळया दगडावरची पांढरी रेघ आहे.

परमपूज्य बोधिसत्व ज्ञानाचे प्रतीक अशी जगमान्य उपाधी भुषविणारे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सर्वच जसे शैक्षणिक,आर्थिक, सांस्कृतिक,सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात आपला गाडा अभ्यासासह संशोधनाद्वारे मानव मुक्तीचा लढा बुलंद करत एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवला. जगातील सर्व विचारवंतांना विचार करावयास भाग पाडला आणि आपला एक वाद सिद्ध केला.. जो अत्यंत क्रांतिकारी मानवता व विज्ञानावर आधारित होता. याबाबतीत बाबासाहेब यांना संपूर्ण विश्वात तोडच नाही.काळाच्याही पुढे असणारा त्यांचा प्रदीर्घ अनुभव,भाषेवर असलेले प्रभुत्व,अफाट ज्ञान प्राप्त करण्याची भूक,त्यासाठी वाटेल तो त्याग करण्याची तत्परता त्यांच्या ठायी होती. त्यांच्या ह्याच उदारमतवादी कृतिशील विचाराने आपल्या सर्वांचा सर्वांगीण विकास होऊ शकला हे उघड सत्य आहे..

बाबासाहेबांचे मानवतावादी विचार त्यांचा दृष्टिकोन त्यांनी आयुष्यभर खाल्लेली खस्ता आणि त्यांचा त्याग हे आपल्याला वारंवार खुणावत आहेत.त्याशिवाय आपल्याला पर्यायही नाही. कारण की

मुळात भारतात तीन विचारप्रवाह आहेत. एक आहे तो मानवतावादी ज्याला आपण पुरोगामी, बंदुभाव जपणारा सर्वांना सोबत घेऊन सर्वांचा सर्वांगीण विकास करू पाहणारा आणि अन्यायाच्या विरुद्ध पेटून उठणारा एक कृतिशील विचार म्हणजेच आंबेडकरवाद हा विचार प्रवाह.. दुसरा आहे मनूवाद ..जो चिमूटभर लोकांसाठी बचकभर वाटा मिळवून समाधान न मानता सतत तो वृद्धिंगत करण्यासाठी समाजामध्ये द्वेष,मत्सर,अंधश्रद्धा, भीती आणि विषमता पसरवून आधीराज्य गाजवत आलेला आहे.हा जो वाद व विचार आहे तो मानवाचे हजारो वर्षापासून आजतागायत शोषण करीत आहे. तिसरा आहे तो समाजवाद म्हणजेच गुळगुळीत विचार असणारा वाद वरवर जरी चांगला वाटणारा असेल परंतु खूप कपटी व पोट भरलेल्या धूर्त लोकांचा सारवासारवीचा विचार.. जो वरील दोघांनाही हामी भरतो. सोयीनुसार चालतो व नियमित तटस्थ राहुन तमाशा बघायची भूमिका घेतो. आपण जर जाणीवपूर्वक विचार केला तर ह्या समाज व्यवस्थेत आपल्याला तारणारा नेमका कोणता विचार प्रवाह आहे हे आपल्याला समजून येईल.



**– ज्योतिबा पारखे**
सामाजिक कार्यकर्ता तथा फकीरा दल सोलापूर जिल्हा प्रमुख

जगाला शांतीचा संदेश देणारे तथागत गौतम बुद्ध,त्यानंतर संत कबीरा व महात्मा ज्योतिबा फुले यांना बाबासाहेबांनी आपले वैचारिक गुरू मानले. वरील तिन्ही महानूभूतींच्या विचाराचे अजरामर मिश्रण हे रसायन म्हणजेच बाबासाहेब होय. म्हणूनच बाबासाहेबांचे ब्राह्मणीकरण झाले नाही वा करता आले नाही.जे भल्याभल्यांनाही पचनी पडले नाही. केवळ भारत देशालाच शांतीचा संदेश न देता संपूर्ण आशिया खंड व त्या पलीकडे जाऊन मानवता पेरणारे बुद्ध,अंधश्रद्धेचे खंडन करून लोकाना प्रेमाने जागृत करणारे संत कबीर त्याचबरोबर क्रांतीबा महात्मा फुले ज्याने शैक्षणिक व सामाजिक चळवळीचा पाया रचला अशा महामानवाना आपले आदर्श मानत त्यांचा विचारावर चिंतन मनन करून आपली घोडदौड सुरू ठेवणारे महामानव बाबासाहेब म्हणून तर ते आपले बलस्थान व प्रेरणास्थान आहेत.त्यांचे विचारच आपणाला स्वातंत्र्याचा मोकळा श्वास घेण्यास व अन्यायाच्या विरुद्ध पेटून उठावयास प्रवृत्त करतात.

सद्यस्थितीचा विचार केला तर चोहीकडे समाजामध्ये वैर,द्वेष प्रकर्षाने जाणवतोय.अंधश्रद्धा शिगेला पोहोचली आहे व विज्ञानवादी दृष्टिकोनाचा ऱ्हास होताना दिसत आहे. बेरोजगारी महागाईने सर्वसामान्य त्रस्त आहेत. सत्तापीपासून व भांडवलदार याचा पुरेपूर फायदा उचलत आहेत. आपली दशा व दिशा याच परिस्थितीमध्ये पुढे सरकत राहिली तर कधी कधी असेही वाटते की तो दिवस दूर नाही जसे की अफगाणिस्तान, पाकिस्तान,श्रीलंका,बांगलादेश इस्राईल ई. सारख्या देशाची भयावह परिस्थिती आपणावर ओढवणार नाही.

यावर आंबेडकरवाद हा एकमेव वादच पर्याय असू शकतो. अन्यथा ह्या विनाशापासून आपणास कोणी रोखू शकणार नाही.वेळ अजूनही गेलेली नाही खऱ्या अर्थाने आपण सर्वजण केव्हा विचार करणार आहोत?आपले शत्रू कोण आपले मित्र कोण हे कधी ओळखणार आहोत?

ज्या विचारांमुळे आपण माणूस झालो आपले माणूस पण मान्य झाले याच्या पलीकडे आणखीन काय हवे आपल्याला ? आपल्याला जनावराच्या पलीकडची वागणूक मिळत असे. ज्या ठिकाणी कुत्रे मांजरा सुद्धा पाणी पिता येत होते अशा नैसर्गिक तळे नद्यांचे पाणी सुद्धा मानवाना वर्ज्य होते. म्हणून अण्णाभाऊ साठे बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त म्हणतात ..

जग बदल घालुनी घाव,
सांगून गेले मज भीमराव..!
गुलामगिरीच्या या चिखलात रुतून का बसला ऐरावत..
अंग झाडूनी निघ बाहेरी
घे बिनी वरती घाव..!

जग बदल घालुनी घाव म्हणजेच मुळावर घाव घालण्याची भाषा करत आहेत.आपल्या सर्वांची सुरुवातच व शेवटही फक्त आणि फक्त महापुरुषाचे विचार व कृतीच आहे तर आपण विचार कसला करतोय? कोणाची वाट पाहतोय?

आपल्याला आपल्यावरील अन्याय माघारी परतवून लावायचा असेल तर जगाला शांतीचा संदेश देणारे क्रांतिकारी तथागत गौतम



बुद्धाने सांगितल्याप्रमाणे अतदीपभव त्याचेच पुढे बाबासाहेबांनी मराठी भाषेतून सांगितले आहे तुच आहे तुझ्या जीवनाचा शिल्पकार ह्याच मार्गाने आपण आपला व सर्व बंधू भावांचा सर्वांगीण विकास साधू शकतो... त्याचबरोबर स्वतः स्वतःचे संरक्षण करत प्रगती साधू शकतो. आज पर्यंत अनेक महापुरुष होऊन गेले त्यांनी या विषमतावादी मनूवादी प्रवृत्तीला वेळोवेळी प्रखर विरोध करत दगड गोटे खात जीवानिशी व संपूर्ण जीवन संघर्ष केला. यातून आपण काही शिकणार आहोत की नाही? आता वेळ आहे.पुन्हा एकदा नीट समजून उमजून घेऊन तीव्र असा संघर्ष करण्याची माणुसकीला वाचवण्याची न्याय समता स्वातंत्र्य व बंधुता या तत्त्वावर असलेल्या संविधानाची रक्षा करण्याची ती आपण करणार आहोत की नाही?

न्याय मागणे व मिळवणे यावर सर्वांचा समान अधिकार आहे असे असतानाही सर्वांना न्याय भेटतो का? उशिराने मिळणाऱ्या न्याय हा अन्यायच असतो.आपण मात्र अन्याय होत असताना मूग गिळून गप्पच बसणार आहोत का? आपल्या या संविधानाची रासरोसपणे सत्ताधारी व भांडवलदाराकडून लक्तरी तोडली जातात दिवसा ढवळ्या संविधानाची प्रत फाडली जातात,आपण मात्र उघड्या डोळ्यांनी पाहतच बसणार आहोत का? इतकच नाही तर आपल्या माय माउल्यावर आजही अन्याय कमी होताना दिसून येत नाही. याची मला चिड येत नाही हाच आमचा गुन्हा आहे का? ही जबाबदारी कोणाची ? बाबासाहेबांच्या प्रत्येक अनुयायाचे हे परम कर्तव्य असेल कि लोकशाही टिकवणे, माणुसकी जपणे,समाजात समानता व बंधुभाव जोपासवयास भाग पाडणे आणि सर्वांगीण प्रगतीच्या दिशेने वाटचाल करणे. का नुसत्याच घोषणा देत डीजेच्या तालावर उदार उसनी पिऊन मिटक्या मारत झिंगत राहणार आहोत? बाबानी सांगितल्याप्रमाणे शिका,संघटित व्हा व संघर्ष करा यावर आपण कधी कृतीशील विचार करणार आहोत की नाही? आणि करणार आहोत तर केव्हा.? आपल्यासारख्या शेकडो छोट्या-मोठ्या जमाती व घटक आपल्याकडे (म्हणजेच बाबासाहेबाचा वाद आंबेडकरवाद)आशा लावून पाहत आहेत त्यांना आपण कधी आंबेडकरवाद समजावून सांगणार आहोत कि नाही?त्यांच्या आयुष्यात भयमुक्त स्वातंत्र्याची बीजं रुजवणार आहोत की नाही?सांस्कृतिक दहशतवाद संपवून मोकळेपणाने जीवनाचा आनंद चाकवणार आहोत की नाही? का आपापसातच एकमेकाला संपवून टाकणार आहोत? हे आपले सामाजिक कर्तव्य नाही का?

जर आंबेडकरवाद हाच विचार आपणाला या देशाला प्रत्येक शोषित वंचित घटकाला तारणारा असेल तर तो विचार समाजामध्ये खालवर रुजवयास नको का? त्याला वाढवण्याचे कोणाचे कर्तव्य आहे?. ही आपली सामाजिक बांधिलकी नाही का? तुझ आहे तुझ पाशी परी का तु चुकलाशी अशी तर गत आपली झाली आहे.

नाही ना? हो अगदी अशीच झाली आहे. आपण ज्या महामानवाचा वारसदार म्हणून घेतो ज्या महामानवाची जगभरात प्रतिष्ठा आहे त्यांचे विचार जगमान्य करत आहे तो विचार आपण समाजाच्या शेवटच्या घटका पर्यंत नेहू नाही शकलो. बाबासाहेबाचा विचार आपण आपल्या बंधू भावा पर्यंत पोहोचवू शकलो नाही आणी त्यांची सर्वांगीण प्रगती साधू शकलो नाही ही खूप मोठी शोकांतिका आहे. बंधुनो मित्रांनो वेळ अजूनही गेलेली नाही खऱ्या अर्थाने बाबासाहेबांना आदरांजली ही या विचारांचीच व त्यांच्या प्रचार व प्रसाराचीच आहे.हि काळाची नीतांत गरज आहे. म्हणून मला आपला सर्वांगीण विकास साधायचा असेल तर आंबेडकरवादाशिवाय पर्याय नाही ही काळा दगडावरील पांढरी रेघ आहे.असे नमूद करावेसे वाटते.आपणास विनंती व आर्जव करू इच्छितो कि आपण यावर विचार कराल..

हीच खऱ्या अर्थाने बाबासाहेबांना आदरांजली व अभिवादन असेल.जय भीम..

# चाकूचे सपासप वार करून महिलेचा निर्घृण खून

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी अतुल सोनकांबळे : इंदापूर तालुक्यातील निमगाव केतकी येथे चाकूने सपासप वार करून विवाहित महिलेची निघृणपणे हत्या झाल्याची धक्कादायक घटना समोर आहे. सुनिता दादाराव शेंडे (वय ३३ वर्षे, रा. शेंडेवस्ती, ता. इंदापूर, जि. पुणे) असे हत्या करण्यात आलेल्या महिलेचे नाव आहे. याप्रकरणी महिलेचे पती दादाराव निवृत्ती शेंडे (वय ३७ वर्षे, रा. शेंडेवस्ती, निमगाव केतकी, ता. इंदापूर) यांनी इंदापूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. यातील धक्कादायक बाब म्हणजे खुनाची घटना घडल्यानंतर आरोपी स्वतःहून इंदापूर पोलीस ठाण्यात हजर झाला. याप्रकरणी आरोपी ज्ञानेश्र्वर बबन रासकर (रा. सुरवड ता. इंदापुर जि. पुणे) याच्या विरोधात इंदापूर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत इंदापूर पोलिसांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार बुधवारी रात्री ८ ते ८.३० च्या दरम्यान निमगाव केतकी सराफवाडी रोडवरील आजिनाथ मोरे यांच्या पत्र्याच्या शेडमध्ये ज्ञानेश्र्वर रासकर यांनी अज्ञात कारणामुळे सुनिता शेंडे यांच्या डोक्यात पोटात आणि छातीवर चाकूने वार केले. यात सुनिता शेंडे यांचा मृत्यू झाला. या गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक पुंडलिक गावडे करीत आहेत.



**आरोपी स्वतःहून पोलीस स्टेशनमध्ये हजर राहून खुन केल्याची दिली कबुली**

# जिल्हा परिषदेत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महापरिनिर्वाण दिना निमित्त अभिवादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : जिल्हा परिषदेत भारत रत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महापरिनिर्वाण दिना निमित्त अभिवादन करणेत आले. जिल्हा परिषदेचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर सर यांचे हस्ते दिप प्रज्वलित करून भारत रत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणेत आला. समाज कल्याण विभागाचे वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करणेत आले होते. या प्रसंगी उप मुख्य कार्यकारी अधिकारी इशाधिन शेळकंदे, उप उप मुख्य कार्यकारी अधिकारी मिरगणे, जलजीवन मिशन चे प्रकल्प संचालक



अमोल जाधव, कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले, कार्यकारी अभियंता नरेंद्र खराडे, शिक्षणाधिकारी शेख, जिल्हा जलसंधारण अधिकारी पारसे, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव, विस्तार अधिकारी मनोज म्हेत्रे, कास्ट्राईब संघटनेचे मार्गदर्शक अरूण क्षिरसागर, कक्ष अधिकारी गिरीष जाधव, कक्ष अधिकारीअविनाश गोडसे, कक्ष अधिकारी सचिन सोनकांबळे , कक्ष अधिकारी सचिन साळुंखे , कक्ष अधिकारी विवेक लिंगराज , प्रमुख उपस्थित होते. यानंतर शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळ्याच्या ठिकाणी सिईओ कोहिणकर यांनी पुष्पचक्र अर्पण करून विभाग प्रमुखांसह अभिवादन केले. आरोग्य विभाग येथे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन केले. अधिक्षक उत्कर्ष इंगळे यांचे सह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# एनआयटी कॉम्प्युटरच्या शिरपेचा अजून एक मानाचा तुरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : महाराष्ट्र ज्ञान महामंडळ म्हणजे एमकेसीएलच्या वतीने केला जाणारा उत्कृष्ट व्यावसायिकता व प्रवेशाचा अवार्ड यंदा सलग १७ व्या वर्षी एनआयटी कॉम्प्युटरला मिळाला.



आज डॉक्टर निर्मलकुमार फडकुले सभागृह सोलापूर येथे महाराष्ट्र ज्ञान महामंडळ अर्थात चघउङ ची वार्षिक सभा संपन्न झाली यावेळेस एमआयटी कॉम्प्युटर च्या वतीने सेंटर हेड श्री गणेश जाधव व श्री श्याम भोगाव यांनी हा पुरस्कार एमकेसीएलच्या व्यवस्थापकीय संचालिका मा विना कामत मॅडम यांच्या हस्ते हा पुरस्कार स्वीकारला चउ-उखढ च्यावर्षी रोपे महोत्सवी वर्षात पदार्पण करीत रोपे महोत्सवी वर्षात पुन्हा एकदा एनआयटी कॉम्प्युटरला पुरस्कृत करण्यात आल्याने एनआयटी कॉम्प्युटर मागील २३ वर्षापासून रॅबिट असलेल्या विविध उपक्रमांना व विद्यार्थ्यांच्या हिताचे प्रशिक्षण शासनाकडून आलेले वेगवेगळे प्रशिक्षण सर्वसामान्य विद्यार्थी गरीब होतकरू विद्यार्थी विद्यार्थिनींना केलेली सहकार्य आजपर्यंत विद्यार्थिनींनी दिलेले विश्वास याबाबत पुन्हा एकदा एमकेसीएल कडून शिक्कामोर्तब करण्यात आला.

यावेळी लोकल लीड सेंटरचे श्री रोहित जेऊरकर, श्री हरून शेख, विभागीय समन्वयक श्री महेश पत्रिके, महाराष्ट्र ज्ञान महामंडळाचे श्री अनिल रानडे, श्री अतुल पठोडी , श्री कुंभार , श्री कौशल, डॉक्टर दीपक पाटील श्री कटक धोंड, आदी उपस्थित होते

# स्वेरीमध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूटमध्ये संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम.पवार यांच्या सहकार्याने, उपप्राचार्या डॉ.मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली महामानव व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या 'महापरिनिर्वाण दिना' निमित्त त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले.

प्रारंभी भारतरत्न डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमा पूजनानंतर प्रथम वर्ष अभियांत्रिकीचे विभागप्रमुख डॉ. यशपाल खेडकर म्हणाले की, 'भारतरत्न डॉ. आंबेडकर यांनी समाजासाठी व समाजाच्या विकासासाठी अत्यंत मोलाचे कार्य केले. भारतीय समाजाला आकार आणि योग्य दिशा देण्याचे भरीव काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. जागतिक पातळीवर समतेसाठीच्या लढ्यांमध्येही बाबासाहेब आंबेडकर प्रेरणादायी ठरले आहेत. भारत स्वतंत्र झाल्यापासून आज महासत्तेच्या दिशेने वाटचाल करत आहे ते केवळ भारताच्या प्रभावी आणि दमदार राज्यघटनेमुळे शक्य झाले आहे. त्यामुळे डॉ. आंबेडकरांचे कार्य अतिशय महान आहे. समाजात भेदभाव न करता सर्व नागरिकांना समान अधिकार मिळावा यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी काम केले होते.' असे सांगून त्यांनी डॉ.आंबेडकर यांचे समाजासाठीचे योगदान अभ्यासपूर्ण शैलीत सांगितले. यावेळी ट्रेनिंग अँड प्लेसमेंटचे अधिष्ठाता प्रा. अविनाश मोटे, संशोधन अधिष्ठाता डॉ. ए.पी. केने, डॉ. संदीप वांगीकर, मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे विभागप्रमुख डॉ. एस.बी. भोसले, कॉम्प्यूटर सायन्स अँड इंजिनिअरिंगच्या विभागप्रमुख डॉ. एस.पी.पवार, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगच्या विभागप्रमुख डॉ.डी.ए.तंबोळी, सांस्कृतिक कार्यक्रम विभागप्रमुख डॉ. आर. एन. हरिदास, इंटरनल क्वालिटी अशुरन्स सेलचे समन्वयक डॉ. एस.एस.वांगीकर, पब्लिसिटी-प्रोटोकॉलचे अधिष्ठाता डॉ. डी. एस. चौधरी, एमसीएचे विभागप्रमुख प्रा. मनसब शेख, प्रा. जी.के.कोष्टी, प्रा. पी.बी. आसबे, प्रा. जे.एस. हल्लूर, मिलिंद कोकणे, एस.डी. मोरे, अमोल चंदनशिवे यांच्यासह इतर प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# लोहा न.पा.त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लोहा/प्रतिनिधी : महापरिनिर्वाण दिनानिमित्त लोहा न पा येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले.

यावेळी उल्हास राठोड कार्यालयीन अधीक्षक, अजिंक्य केंद्रे लेखापाल, ढवळे मॅडम,जाधव मॅडम,शिंदे मॅडम, शंकर वाघमारे,गायकवाड साहेब, विष्णू भिसे, चांदू राजकोर,जितू टेवरे, सदानंद धुतमल आदी सह इतर नगर परिषद कर्मचारी उपस्थित होते.



हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### शिवसेनेचे नेते सागर पाटील यांच्या गाडीवर हल्ला

पंढरपूर : शिवसेनेचे नेते सागर पाटील यांच्या गाडीवर हल्ला झालेला ही घटना निषेधार्थ असून या घटनेची सखोल चौकशी करावी अशी मागणी सांगोला पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक भीमराव खंणटाळे यांच्याकडे शेतकरी कामगार संघटनेचे नेते आ. डॉक्टर अनिकेत देशमुख यांनी पोलीस निरीक्षक भीमराव खंणदाळे यांच्याशी संपर्क साधला. यावेळी याबाबत माहिती घेतली असता पोलीस स्टेशनला याबाबत कोणत्याही गुन्हा दाखल झालेला नाही असे सांगण्यात आले असून संघटनेचे सखोल चौकशी करण्याची मागणी शेकापचे सकाळचे नेते अनिकेत देशमुख यांनी केली आहे. सांगोला तालुक्यामध्ये स्वर्गीय आबासाहेबांनी ज्या पद्धतीने सुसंकृत राजकारण व समाजकारण केले होते त्याच पद्धतीने येणाऱ्या काळात सुद्धा त्याच पद्धतीने कामकाज करण्यात येणार असून गुन्हेगारी प्रवृत्तीचा थरार देण्यात येणार नाही. त्यामुळे अशा हल्ल्यांना शेतकरी कामगार पक्ष कदापि पाठीशी घालणार नसून या घटनेचा मी व्यक्तीच्या निषेध करून करत असून घटनेची सखोल चौकशी करण्याची मागणी डॉक्टर अनिकेत देशमुख यांनी पोलीस निरीक्षक भीमराव खंणदाळे त्यांच्याकडे केली आहे.

# बाळशास्त्री जांभेकर सन्मान योजनेच्या अटी व नियम शिथिल करणार, ज्याच्या अंमलबजावणी आठवड्यात होणार

## मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाच्या सततच्या पाठपुराव्याला यश; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : आचार्य बाळ-शास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजनेचे निकष शितल करण्यात चा निर्णय तसेच दरमहावीस हजार रुपये सन्मान निधी देण्याचा शासन निर्णयावर येथे आठवड्यात कार्यवाही करण्यात येईल, अशी घोषणा राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे.

राज्याच्या मुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर प्रत्येक प्रमाणे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे मंत्रालयातील पत्रकार कक्षात येऊन पत्रकार परिषद संबोधित केली. यावेळी मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा अध्यक्ष प्रमोद डोईफोडे यांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला.

त्यावेळी त्यांनी ही घोषणा केली व या कार्यक्रमात मनोगत व्यक्त करताना संघाचे अध्यक्ष प्रमोद डोईफोडे यांनी आवर्जून हा मुद्दा उपस्थित केला.

व माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंत्रालय व विधिमंडळ वार्ताहर संघाच्या २ मे १९२३ रोजी सह्याद्री अतिथी ग्रहा ग्रहात झालेल्या पुरस्कार वितरण कार्यक्रमात सन्मान निधी वाढवण्याची घोषणा केली होती. व लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्यापूर्वी मार्च २०२४ मध्ये राज्य सरकारने राज्यातील निवृत्त पत्रकारांना देण्यात आले.

सन्मान विधी योजनेचे दरमहा देण्यात येणारा रक्कम रुपये ११००० ऐवजी २० हजार रुपये करण्याचा निर्णय (जीआर) जारी केला मात्र त्याची अजूनही अंमलबजावणी करण्यात आली नसल्याचे अध्यक्ष डोईफोडे यांनी निदर्शनास आणले महायुती सरकारने लाडक्या बहिणीची सन्मान केला तसाच सन्मान राज्यातील ज्येष्ठ पत्रकारांचा करून त्यांनाही दिलासा द्यावा अशी मागणी डोईफोडे यांनी केली.

आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान निधीचे निकष शिथिल करण्याचाही निर्णय तसेच वीस हजार रुपये दरमहा सन्मान विधी देण्यासंदर्भात जारी केल्याच्या शासन निर्णयावर येत्या आठवड्यात कारवाई केली जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या या घोषणेमुळे राज्यातील अनेक ज्येष्ठ पत्रकारांचा फायदा होणार आहे सन्मान निधीत वाढ करून ती ११००० ऐवजी २०००० रुपये करण्यात यावी तसेच शासन निर्णयाच्या अंमलबजावणी करण्यात यावी यासाठी मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाने पाठपुरावा केला होता.



# मुंबई महानगरपालिकेतर्फे छायाचित्र प्रदर्शनास राज्यपाल, मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांसह मान्यवरांची उपस्थिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

विजय घनघाव/मुंबई : ६८व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आज दादरच्या चैत्यभूमीवर विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी महापरिनिर्वाण दिनानिमित्त मुंबई महानगरपालिकेतर्फे आयोजित केलेल्या छायाचित्र प्रदर्शनास भेट देऊन दुर्मीळ छायाचित्रे पाहून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतींना उजाळा मिळाला. तसेच या कार्यक्रमात माजी खासदार नरेंद्र जाधव यांच्या 'भारतीय प्रजासत्ताक साकारणारा महामानव' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या विद्वत्तेचा उपयोग



तळागाळातील लोकांना सशक्त करण्यासाठी केला असल्याचे मत यावेळी बोलताना व्यक्त केले. तसेच बाबासाहेबांनी केवळ भारतातच नाही तर जगभरातील हक्कांना मानवी प्रतिष्ठेला वैचारिक संघटनात्मक बळ मिळवून दिले आहे. लोककल्याणकारी योजनांच्या माध्यमातून दुर्बल घटकांना सशक्त करण्याचा प्रयत्न सरकार म्हणून आम्ही करत आहोत.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी आम्ही कमी पडणार नाही. इंदू मिलचे स्मारक लवकरात लवकर पूर्ण करण्याचा आमचा प्रयत्न आहे. प्रत्येक जिल्ह्यात प्रत्येक तालुक्यात संविधान मंदिर बांधणार असल्याचे स्पष्ट केले.

याप्रसंगी राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, दीपक केसरकर, राहुल शेवाळे, मंगलप्रभात लोढा, कालिदास कोळंबकर, अमर साबळे, अमोल मिटकरी, राजकुमार बडोले, मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुंबई मनपा आयुक्त भूषण गगराणी आणि इतर अधिकारी तसेच पदाधिकारी उपस्थित होते.

# कृषी विभागाच्या वतीने बोपगांव येथे हरभरा लागवड तंत्रज्ञान शेती कार्यशाळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर/प्रतिनिधी डॉ विनायक गायकवाड : बोप-गाव तालुका पुरंदर जिल्हा पुणे येथे महाराष्ट्र शासन कृषी विभागाच्या वतीने सुधारित जाती तंत्राने हरभरा लागवडी विषयक कृषी विभागाचे कृषी पर्यवेक्षक श्री गणेश जगताप व कृषी सहाय्यक विजय जाधव यांनी शेती कार्यशाळेचे आयोजन केले होते या कार्यशाळेसाठी बोपगावच्या विद्यमान सरपंच सौ ज्योतीताई फडतरे या उप-स्थित होत्या कोरडवाहू तसेच ओलिताखाली हरभऱ्याच्या विजय, दिग्विजय,राज विजय, जॉकी, डॉलर,साकी,हिरवा चाफा, पिकेव्ही सरिता,या सुधारित देशी वानांची शिफारस करण्यात आली आहे.

वेळेवर पेरणी ऑक्टोबरचा



दुसरा आठवडा तर संरक्षित ओ-लीतात दहा नोव्हेंबर पर्यंत पेरणी करता येते.सुधारित तंत्रज्ञानाचा वापर करून अपेक्षित व गुणवत्तापूर्ण उत्पादन घेता येते.

लागवड तंत्रातील टिप्स यावेळी सांगण्यात आल्या

१) अन्नद्रव्य व रसायन यांचा वापर २) तन नियंत्रण ३) कमी उत्पादनासाठी कारणीभूत असणाऱ्या गोष्टींची माहिती देण्यात आली ४) पाण्याचे व्यवस्थापन ५) पीक संरक्षण तसेच सुधारित पेरणी पद्धतीचा वापर याविषयी माहिती दिली १) बीबीएफ प्लॅटर चा वापर २) पट्टा पेर पद्धत ३) अन्य पद्धती

हरभऱ्यामध्ये देशी वान व काबुली वान असे दोन प्रकार आहेत हरभरा लागवडीसाठी अधिक उत्पादन क्षम सुधारित वानांची निवड शेतकऱ्यांनी करावी.

सदर कार्यशाळेसाठी गावा-तील असंख्य प्रगतशील शेतकरी महिला व पुरुष या ठिकाणी उपस्थित होते .कृषी पर्यवेक्षक गणेश जगताप यांनी उपस्थित सर्व शेतकरी बंधू भगिनींना अनमोल असे मार्गदर्शन केले व कृषी सहाय्यक विजय जाधव यांनी उपस्थित सर्व शेतकरी बंधू-भगिनींचे आभार मानले.




यशसिद्धी आजी-माजी सैनिक बहुउद्देशीय वेल्फर असोसिएशन महाराष्ट्र राज्य यांच्यातर्फे आज महामानवांना सलामी देण्यात आली उपस्थिती राज्य अध्यक्ष सुभेदार प्रदीप गायकवाड, राज्यउपाध्यक्ष शिवपुत्र घटकांबळे मुंबई विभागीय अध्यक्ष अजित न्याय निरगुणे, पुणे विभागीय अध्यक्ष बुद्ध कांबळे, विधी सल्लागार एडवोकेट राजेंद्र खोब्रागडे, सुभेदार संतोष वानखेडे,सुभेदार भगवान हिंगोले,सुभेदार विश्वनाथ गायकवाड.

# भिमाई आश्रमशाळेत महामानवास महापरिनिर्वाणदिनी अभिवादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी अतुल सोनकांबळे : येथील मातोश्री रमाबाई आंबेडकर विद्यार्थी वसतिगृह ट्रस्ट संचलित प्राथमिक, माध्यमिक,उच्च माध्यमिक आश्रमशाळा तसेच मुलांचे, मुलींचे अनुदानित वसतिगृह यांच्यावतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर शैक्षणिक संकुलात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनी अभिवादन करण्यात आले.यावेळी तथागत



गौतम बुद्धमूर्तीस,डॉ. बाबासाहेब आंबेडकर व संस्थेचे दिवंगत अध्यक्ष रत्नाकर मखरे यांच्या प्रतिमांना वसतिगृह कर्मचारी जगदीश कांबळे यांच्या हस्ते पुष्प/ पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी सामूहिक बुद्ध वंदना घेण्यात आली. अनेक विद्यार्थ्यांनी भाषणातून व गीतांमधून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवन कार्याला उजाळा दिला. कार्यक्रमास संस्थेचे सचिव ड.समीर मखरे, प्राचार्या अनिता साळवे तसेच अधीक्षक, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन हिरालाल चंदनशिवे यांनी केले.

**नागरिकाकडून संविधान प्रतीला मोठी मागणी** | **राज्यातून लाखो भीम अनुयायी दाखल**

# बार्टी पुस्तक स्टॉलवर पुस्तके खरेदी करण्यासाठी भीमसागर उसळला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई /प्रतिनिधी : भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर त्यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त चैत्यभूमी दादर येथे अभिवादन करण्यासाठी देशातील विविध राज्यातुन लाखो भीम अनुयायांनी येत असतात.

डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे संस्थेच्या वतीने शिवाजी पार्क मैदानावर भीम अनुयायांसाठी ८५% सवलतीच्या दरात डॉ बाबासाहेब आंबेडकर व ईतर महामानवाचे पुस्तके उपलब्ध करून देण्यात आली होती.

महापरिनिर्वाण दिनी बार्टी पुस्तक स्टॉलचे उद्घाटन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे सचिव श्री विजय वाघमारे यांच्या हस्ते अनुयायांना पुस्तकांचा संच भेट देऊन करण्यात आला.

उद्योग विभागाचे सचिव श्री हर्षदीप कांबळे तसेच जीएसटीचे आयुक्त श्री निखिल मेश्राम यांच्या हस्ते अनुयायांना




भोजन पॅकेटचे वाटप करण्यात आले. विधान परिषदेचे आमदार श्री अमोल मिटकरी यांनी सुध्दा पुस्तक स्टॉलला भेट देऊन पुस्तके खरेदी केली.

याप्रसंगी बार्टी संस्थेचे महासंचालक श्री सुनिल वारे, निबंधक श्रीमती इंदिरा अस्वार, विभागप्रमुख श्रीमती स्नेहल भोसले, श्री उमेश सोनवणे, प्रकल्प व्यवस्थापक श्रीमती नसरिन तांबोळी, सुमेध थोरात यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

भीम अनुयायांनी बार्टी पुस्तक स्टॉलवरून पुस्तकांची विक्रमी खरेदी केली. अनुयायांनी बार्टीची पुस्तके खरेदी करण्यासाठी आज सकाळपासूनच रांगेत उभे होते. संविधानाचे अमृत महोत्सवी वर्ष असल्यामुळे संविधान, उद्देशिका , डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे खंड व ईतर महापुरुषांच्या पुस्तकांची खरेदी करण्यासाठी अनुयायांची लगबग दिसून आली . विद्यार्थी , महिला आंबेडकरी चळवतील कार्यकर्ते इतिहास संशोधक , अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात पुस्तकांची खरेदी केली.

बार्टीच्या विविध योजनांचा लाभ अनुयायांना होण्यासाठी माहिती पुस्तिका विनामूल्य देण्यात आल्या.

अनुयायांना बार्टी तर्फे सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सामाजिक न्याय विभागाचे सचिव श्री विजय वाघमारे आणि बार्टीचे महासंचालक सुनिल वारे यांच्या मार्गदर्शनाखाली बार्टीच्या टीमने नियोजन केले.

गेल्या तीन दिवसांपासून बार्टीचे अधिकारी व कर्मचारी मुंबई उपनगरचे समतादुत मेहनत घेत आहेत.

# श्री जगद्गुरू पंचाचार्य प्रशालेत महापरिनिर्वाण दिन साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : गौडगाव बुख येथील श्री गुरु सिद्धमल्लेश्वर कल्याण केंद्र संचलित श्री जगदुरु पंचाचार्य प्रशालेत घटनेचे शिल्पकार महामानव,विश्वरत्न,भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आले.प्रारंभी प्रशालेचे माजी विद्यार्थी विश्वनाथ चव्हाण यांच्या अमृत हस्ते प्रतिमेचे पूजन, पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्रशालेचे मुख्याध्यापक कल्याणी देशेट्टी होते. यावेळी श्रुती धा-वणे, अन्वी पाटील, आश्विनी बमगोंडा, अंबिका पाटील, लक्ष्मी शेरीकर, प्रणिता कोरे या विद्यार्थिनींनी तसेच पोपट सोनकांबळे ,विश्वनाथ चव्हाण व मुख्याध्यापक कल्याणी देशेट्टी आदींनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पर्यवेक्षक लाडप्पा शिंदे सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवक वर्ग परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तुकाराम जाधव यांनी केले तर सोनाली साठे यांनी आभार मानले.



## थोडक्यात...

### भाचीच्या साखरपुड्यास गेल्यावर घरफोडी

**सोलापूर :** भाचीच्या साखरपुडा कार्यक्रमासाठी बाहेर गेल्यानंतर अज्ञात चोरट्याने घराचा कडी-कोंयडा तोडून घरात प्रवेश करत बेडरूम मधील लोखंडी कपाटातील ठेवलेले दोन लाखाचे दागिने रोख रक्कम चोरून नेले.याप्रकरणी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याच्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे.

फिर्यादी शिवदास हरवाळकर (वय-५६ रा.गुरुकृपा नगर, बाळे) हे ५ डिसेंबर रोजी साखरपुडा कार्यक्रमासाठी परगावी गेले असताना अज्ञात चोरट्याने कपाटातील सोन्याचे मनी मंगळसूत्र,अंगठी,बोरमाळ,कानातील टॉप्स, सोन्याचे बदाम,चांदीचे पैंजण,छल्ला,पंच मोदक,रोख ५० हजार असा जवळपास २ लाख ६ हजार रुपये किमतीचा ऐवज चोरून नेला आहे.अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक धायगुडे हे करत आहेत.

# एकनाथ शिंदे यांना सोलापूर लोकसभा संपर्कप्रमुख महेश नाना साठे यांनी पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपू/ प्रतिनिधी : गेल्या अडीच वर्षाच्या कालखंडामध्ये यशस्वी गतिमान कार्यक्रम सरकारचे यशस्वी सरकारची कारकिर्द खऱ्या अर्थाने यशस्वी ठरले जे बहुमत बहुमत मिळाले हे जनतेच्या कामाचे पोचपावती आहे. आम्ही गेले ४० होतो. आता ५७ अधिक ३ अशी ६० आहोत.

## जनतेसाठी जनतेचे सरकार स्थापन केले आहे : एकनाथ शिंदे

आमच्यासाठी सत्ता साध्य नसून जनतेसाठी साधन आहे असे आम्ही जनतेची काम केलेले आहे. आम्ही जनतेचे काम केलेले आहे आम्हाला काय मिळाले यापुढे काय मिळणार आहे भावना न ठेवता जनतेची लवकरच जनतेसाठी जनतेचे सरकार स्थापन केले आहे प्रतिक्रिया राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि पत्रकार परिषदेत व्यक्त केली.

शपथविधीनंतर त्यांनी पत्रकार परिषद घेतली त्या पत्रकार परिषदेमध्ये बोलत होते शिवसेना लोकसभा संपर्कप्रमुख महेशदानासाठी यांनी उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांचे शुभेच्छा दिल्या अभिनंदन केले व त्यांना पत्रकार परिषदेमध्ये बसण्याचा मान मिळाला आहे.

नवनिर्वाचित मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार व या दोघांनीही दोघांचेही अभिनंदन केले दोघांचीही अभिनंदन करतो दोघांनीही मागील सरकारच्या कारकीर्दीमध्ये चांगले योगदान देऊन एक टीम म्हणून त्यांचा यांनी केलेले आहे त्यांच्यामुळे काम करणे ही शक्य झाले देवेंद्र फडणवीस यांनी मुक्त मुख्यमंत्री म्हणून माझं नाव सुचवलं होतं व आता देवेंद्र फडणवीस यांचे नाव मी मुख्यमंत्री म्हणून सुचवलं त्यांचा मुख्यमंत्री पदाचा अनुभव आम्हाला मुख्यमंत्री कारकिर्दीत कामे आला त्यामुळेच हे सरकार यशस्वी कारकीर्द करू शकले व खऱ्या अर्थाने बहुमत मिळाले.

मी सीएम असताना नेहमी कॉमन मॅन म्हणून काम केले आता मी सीएम म्हणजे कॉमन मॅन म्हणून २४ तास काम करणार आहे यापुढेही आम्ही राजाला पुढून येण्यासाठी आम्ही टीम चांगली म्हणून एकही काम करणार आहे असे त्यांनी आम्ही कुठेही कमी पडणार नाही असे म्हणाल्याने त्यांनी नवनिर्वाचित मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन केले व त्यांच्या कार्यकर्तेत विकास कसा गतिमान होईल याकडे आम्ही तिघेही लक्ष देऊन सरकारचं अतिशय चांगल्या प्रकारे काम करून दाखवणार आहे.

# कल्याणशेट्टी शिक्षण संकुलनात डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सौ सुरेखा कल्याणशेट्टी माध्य व उच्च माध्यमिक मराठी व सेमी इंग्रजी विद्यालय, गिरीजामता मराठी व सेमी इंग्रजी प्राथमिक विद्यालय यांच्या वतीने भारतीय घटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला.

प्रारंभी संस्थेचे जेष्ठ संचालक



मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. याप्रसंगी प्रशालेचे मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी उपस्थित होते. यावेळी सांस्कृतिक विभाग प्रमुख सौ.कल्पना स्वामी यांनी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे बालपण, शिक्षण, सामाजिक कार्य, संविधान निर्मितीतील योगदान याविषयी माहिती दिली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी आपली मनोगते व्यक्त केली. यावेळी संचालिका शांभवी कल्याणशेट्टी, संचालक मल्लिकार्जुन मसुती, सीईओ रूपाली शहा, कनिष्ठ महाविद्यालय विभाग प्रमुख पूनम कोकळगी, प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे हे उपस्थित होते. या कार्यक्रमास पर्यवेक्षक सूर्यकांत रूगे, सेमी विभागाचे दिगंबर जगताप, कुमार जाधव, निशिगंधा कोळी, पूजा कडबगावकर, श्रीदेवी मायनाळे, रविकिरण दंतकाळे आदी सर्व शिक्षक, कर्मचारीवर्ग व विदयार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महामानव डॉ. आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

रायगड/प्रतिनिधी :

उपविभागीय अधिकारी, रायगड लघु पाटबंधारे उप विभाग क्र.१ (बांधकाम), ता. कर्जत, जिल्हा रायगड उपविभागीय अधिकारी संजीवकुमार शिंदे, सहाय्यक अभियंता महाडिक मॅडम, कनिष्ठ अभियंता महेंद्र गव्हाळे सर कलेणी बनसोडे व इतर



अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

## महापरिनिर्वाणदिनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन; चैत्यभूमी येथील काही क्षण













## महापरिनिर्वाणदिनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना सोलापूर जिल्ह्यातील अभिवादनप्रसंगी काही क्षण



अक्कलकोट भीमनगर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले



ग्रामपंचायत गोगांव



जिल्हा परिषद शाळा गोगांव



जिल्हा परिषद शाळा वागदरी



डॉ बाबासाहेब आंबेडकर नगर गोगांव



भीम नगर वागदरी



शिवाजी पार्क, दादर येथे दैनिक यश सिध्दी न्युज पत्रकार मिलिंद जाधव